# ई पिक पाहणी ॲप वापरताना नेहमी उद्धवणाऱ्या प्रश्नांची उत्तरे

1. प्रश्न: ई. पिक पाहणी ॲप काय आहे?
उत्तर: शेतकर्यांनी स्वताच्या शेतातील पिकाचा अहवाल स्मार्टफोन द्वारे सादर करण्याची संगणकीय प्रणाली आहे.

2. प्रश्न: ई. पिक पाहणी ॲपचा वापर करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास कोणाशी संपर्क साधावा?
उत्तर: तांत्रिक मदतीसाठी हेल्पलाईन क्र. 2025712712 या दूरध्वनी क्रमाकाशी संपर्क साधावा.

3. प्रश्न: ई-पिक पाहणी मोबाईल ॲप वापरण्यासाठी काय माहिती आवश्यक आहे ?
उत्तर: ई-पिक पाहणी मोबाईल ॲप वापरण्यासाठी खालील माहिती आवश्यक आहे:
- अद्यावत प्रणाली एन्ड्रोईड ४.४ किंवा त्यावरील
- सेन्सर A-gps
- इंटरनेट: 3G, 4G किंवा वायफाय
- मेमरी कमीतकमी १GB रॅम
- कीबोर्ड गुगल इंडिक कीबोर्ड ( मराठी साठी)

4. प्रश्न : ई-पिक पाहणी मोबाईल ॲप कसे स्थापित करावे
उत्तर : स्मार्टफोन मध्ये इंटरनेट सुरु करून प्लेस्टोअरवर epeek असा शब्द टाईप करा व ई-पिक पहाणी (E-peek Pahani Department of Revenue, Government of Maharashtra) https://play.google.com/store/apps/details?id=org.mahait epeek निवडावे व स्थापित करावे.

5. प्रश्न: ई-पिक पाहणी मोबाईल ॲप डाऊनलोड केल्यानंतर काय करावे?
उत्तर- ई. पिक पाहणी मोबाईल ॲप डाऊनलोड केल्यानंतर **'install'** (इंस्टाल) वर क्लिक करावे, ॲप परमिशन विचारले असता 'allow' वर क्लिक करावे.

6. प्रश्न: ई पिक पहाणीच्या नोंदी मोबाईल द्वारे करण्यासाठी कोणत्या प्रकारचा मोबाईल वापरण्यात यावा?
उत्तर - ई- पिक पहाणीच्या नोंदी मोबाईल द्वारे करण्यासाठी **एन्ड्रोईड** प्रकारचा मोबाईल वापरण्यात यावा.

7. प्रश्न : ईपिक पाहणी मोबाईल ॲप नाव नोंदणी कशी करावी?
उत्तर - ॲप सुरु केल्यानंतर प्रथम आपला **"मोबाईल क्रमांक"** प्रविष्ट करा व **'पुढे'** या बटनावर क्लीक करा. त्यानंतर आपला महुसल विभाग,जिल्हा, तालुका व गाव निवडा व नंतर खातेदार निवडा या खाली दिलेल्या ५ पर्यायांपैकी एक पर्याय निवडून आपले नाव शोधा व **'पुढे जा '**जा यावर क्लिक करा नंतर आपणास ४ अंकी संकेताक प्राप्त होईल तो प्रविष्ट करा.

8. प्रश्न: खाता क्रमांक माहित नसल्यास खातेदाराचे नाव कसे शोधायचे?
उत्तर- खाता क्रमांक माहित नसल्यास आपण आपल्या नावातील पहिले नाव, मधले नाव, आडनाव अथवा गट क्रमांकाने नाव शोधू शकता.

9. प्रश्न: एका मोबाईल वरून किती खातेदारांची नावनोंदणी करू शकतात?
उत्तर- एका मोबाईल वरून ५० खातेदारांची नाव नोंदणी करू शकतात.

10 प्रश्न: एका मोबाईल वर मोबाईल क्रमांक बदलून ५० पेक्षा जास्त खातेदारांची नावनोंदणी करता येऊ शकते का?
उत्तर- एका मोबाईल वर मोबाईल क्रमांक बदतून ५० पेक्षा जास्त खातेदारांची नावनोंदणी करता येऊ शकत नाही.

11. प्रश्न: नाव नोंदणी केलेला मोबाईल क्रमांक बदलता येतो का
उत्तर- नाव नोंदणी केलेला मोबाईल क्रमांक बदलता येत नाही.

12. प्रश्न: एकाच मोबाईल वरून एक पेक्षा जास्त नाव नोंदणी कशा प्रकारे करावी?
उत्तर- एकाच मोबाईल वरून एक पेक्षा जास्त नाव नोंदणी करण्याकरिता **'नवीन खातेदार नोंदणी करा '** या पर्यायाचा वापर करावा

13. प्रश्न: नवीन नाव नोंदणी केलेला खातेदाराचा मोबाईल क्रमांक बदलता येतो का?
उत्तर- नवीन नाव नोंदणी केलेल्या खातेदाराचा मोबाईल क्रमांक बदलता येऊ शकतो.

14. प्रश्न: एखादया खातेदाराकडे स्वतःचा स्मार्टफोन नसेल तर त्याने ई- पिक पाहणी नोंदणी कशी करावी?
उत्तर- त्यावेळी त्यांनी सहज उपलब्ध होणारा दुसरा स्मार्टफोन वापरावा

15. प्रश्न: संकेतांक विसरल्यास काय करावे?
उत्तर- संकेतांक विसरल्यास आपण **'संकेतांक विसरलात?'** हा पर्याय निवडावा आपणास संकेतांक व मोबाईल क्रमांक दिसेल, तो संकेतांक क्रमांक प्रविष्ट करून **'पुढे'** हा पर्याय निवडा

16. प्रश्न: नवीन नाव नोंदणी केल्यानंतर खातेदाराची माहिती कुठे भरावी
उत्तर- नवीन नाव नोंदणी केल्या नंतर खातेदाराची माहिती परिचय हा पर्याय निवडावा व आपली योग्य माहिती यात प्रविष्ट करावी.

17 प्रश्न: एक खाता क्रमांकात एक पेक्षा जास्त खातेदार असल्यास काय करावे?
उत्तर- एक खाता क्रमांकात एक पेक्षा जास्त खातेदार असल्यास **'खातेदारांची माहीती'** या पर्याया अंतर्गत सर्व खातेदारांची नावे दिसतील. या यादीतून स्वतः चे नाव निवडावे व **'पुढे'** यावर क्लिक करावे.

18 प्रश्न : ई-पिक पाहणी ॲपद्वारे किती पिक वर्ग नोंदवता येतील
उत्तर- खालील 2 पिकांचे वर्ग नोंदवता येतील

- निर्भेळ पिक
- मिश्र पिक

19 प्रश्न : पिकपेरा कसा भरावा?
उत्तर- होम पेजवरील ' **पिकाची माहिती नोंदवा'** हा पर्याय निवडावा व योग्य माहिती यात प्रविष्ट करावी.

20. प्रश्न: खातेदाराने आपल्या गटावर पिकाची माहिती कशी भरावी?

उत्तर- **पिकाची माहिती नोंदवा** या पर्याय अंतर्गत आपण आपला **खाता क्रमांक** निवडून **गट क्रमांक** निवडावा गट क्रमांक निवडल्यावर आपणास आपल्या गटावरील क्षेत्र दिसेल, त्यानंतर योग्य त्या पिकाची माहिती भरावी.

21. प्रश्न: निर्भेळ पिक म्हणजे काय?

उत्तर- निर्भेळ पिक म्हणजे एका क्षेत्रावर एकावेळी एकच पीक घेतले असल्यास त्याला निर्भेळ पीक म्हणतात.

22. प्रश्न: 'मिश्र पिक' म्हणजे काय?

उत्तर- **' मिश्र पिक '** म्हणजे एकाच वेळी एकाच शेतात दोन किंवा अधिक पिके एका आड एक रांगेमध्ये किंवा एकत्रीत घेणे याला मिश्र पीक पद्धती असे म्हणतात.

23. प्रश्न: पिकाची माहिती कशी नोंदवावी?

उत्तर- खालील प्रमाणे क्रमवार माहिती भरावी.

- खाता क्रमांक निवडा
- भूमापन क्रमांक निवडा
- जमिनीचे क्षेत्र दिसेल
- योग्य हगाम निवडा
- पिकाचा वर्ग निवडा
- पिकाचा प्रकार निवडा
- पिकाचे नाव निवडा
- पिकाचे क्षेत्र हे. आर. मध्ये भरा
- जलसिंचित चा योग्य पर्याय निवडा व सिंचनाची योग्य पद्धत निवडावी.
- पिक पेरणीचा /लावल्याचा योग्य दिनांक भरा
- अक्षांश रेखांश मिळवा
- पिकाचा फोटो अपलोड करा

24. प्रश्न: पिक पाहणी चे क्षेत्र कसे नोंदवावे?

उत्तर- पिक पाहणी चे क्षेत्र हे. आर. मध्ये नोंदवावे.

25.प्रश्न: पिक पहाणी एकर मध्ये नोंदता येईल काय?

उत्तर- नाही, पिक पाहणी चे क्षेत्र हे. आर. मध्येच नोंदवावे.

26.प्रश्न: पिक पहाणी एकर मधील क्षेत्र हे. आर. मध्ये कसे नोंदवावे?

उत्तर- खालील प्रमाणे एकर मधील क्षेत्र हे. आर. मध्ये नोंदवावे

१ एकर =४० आर किंवा ०.४०हे.

27.प्रश्न: पिक पहाणी १ बिगे क्षेत्र हे आर. मध्ये कसे नोंदवावे?

उत्तर- खालील प्रमाणे एकर मधील क्षेत्र हे. आर. मध्ये नोंदवावे

१विघा = ३० आर किंवा०.३०हे.

28. प्रश्न: पिकांच्या कोणत्या अवस्था समाविष्ठ कराव्यात?
उत्तर-
- पिकपेरणी नंतर 2 आठवडे
- पिकाची वाढलेली अवस्था
- कापणी पूर्वी अवस्था

29. प्रश्न: परिचय साठी खातेदाराचा प्रोफाईल फोटो कसा अपलोड करावा?
उत्तर- परिचय साठी खातेदाराचा प्रोफाईल फोटो 2 प्रकारे निवडता येतो
- मोबाईल फोन गॅलरी मधून निवडून
- मोबाईल कॅमेरा ने नवीन फोटो काढून,

30. प्रश्न: प्रोफाईल फोटो अपलोड करणे बंधनकारक आहे काय ?
उत्तर- प्रोफाईल फोटो अपलोड करणे बंधनकारक नाही.

31. प्रश्न: ई-पिक पाहणी या ॲप द्वारे पडीक क्षेत्र नोंदवता येते का?
उत्तर- होय, या ॲप द्वारे पडीक क्षेत्र नोंदवता येते.

32. प्रश्न: या ॲप द्वारे पडीक क्षेत्र कसे नोंदवावे ?
उत्तर- लागवडी लायक पडीक क्षेत्र असल्यास कायम पड /चालू पड या पर्याया मध्ये **'पड क्षेत्र'** हा पर्याय निवडावा.

33. प्रश्न: 'कायम पड' म्हणजे काय?
उत्तर- 'कायम पड' म्हणजे असे क्षेत्र ज्यावर कायमस्वरूपी कुठल्याही प्रकारचे पिक घेतले जात नाही.

34. प्रश्न: 'कायम पड कसे नोंदवावे?
उत्तर- 'कायम पड' या पर्याय अंतर्गत कायम पड़ जमीन माहिती मध्ये जमीन माहिती निवडून यादीतील योग्य तो कायम पड प्रकार निवडून त्याखालील क्षेत्र भरा व माहिती साठवा.

35. प्रश्न: बहुवार्षिक पिकांची नोंद कशी करावी?
उत्तर- बहुवार्षिक पिक हे पिकांची नोंद करा या पर्याययात हंगाम संपूर्ण वर्ष निवडून पिकाचा प्रकार निवडावा वपिकाची निवड करून योग्य ते क्षेत्र भरावे व खाली कैलेंडर मध्ये ज्या दिनांकास लागवड केली असेल तो दिनांक, महिना व वर्ष निवडून लाईव्ह फोटो काढून सबमिट करावे.

36. प्रश्न: हंगामात फळबाग नोंद करता येईल काय?
उत्तर- होय फळबाग नोंद करता येईल

37. प्रश्न: फळबाग नोंद कशी करावी?
उत्तर- फळबाग नोंद करण्यासाठी पिकांची नोंद करा या पर्यायात योग्य हंगाम निवडून पिकाचा प्रकार यात फळबाग निवडावे व योग्य ते क्षेत्र भरावे व खाली कैलेंडर मध्ये पिक ज्या दिनांकास लागवड केली तो दिनांक, महिना, व वर्ष निवडून लाईव्ह फोटो काढून सबमिट करावे.

38. प्रश्न: जुनी फळबाग कशी नोंदवावी ?

उत्तर- जुनी फळबाग नोंद करण्यासाठी पिकांची नोंद करा या पर्यायात योग्य हंगाम निवडून पिकाचा प्रकार यात फळबाग निवडावे व योग्य ते क्षेत्र भरावे व खाली कैलेंडर मध्ये पिक ज्या दिनांकास लागवड केली तो दिनांक महिना वर्ष निवडून लाईव्ह फोटो काढून सबमिट करावे.

39. प्रश्न: मी माझ्या शेतात भात व आंबा हे पिक स्वतंत्रपणे घेतले आहे तर याची नोंद कशी करावी?

उत्तर- ई-पिक पाहणी मध्ये पिकांची माहिती या पर्यायात आधी योग्य हंगामाची निवड करून भात पिकाची योग्य महिती भरून फोटो सबमिट करावा व त्यानंतर उर्वरित क्षेत्रासाठी आंबा पिकाची संपूर्ण वर्ष निवडून योग्य दिनांक भरून फोटो सबमिट करा या प्रकारे शेतात भात व आंबा पिकाची यशस्वीरीत्या नोंद करता येईल.

40. प्रश्न: सिंचन पद्धत कशी निवडावी?

उत्तर- पिकांची नोंद करा पर्यायात आधी जल सिंचनाचे साधन निवडावे त्या नंतर सिंचन पद्धत निवडावी.

41. प्रश्न: ई-पिक पाहणी ॲप हँग होत असल्यास काय करावे ?

उत्तर- ॲप हँग होत असल्यास चालू असलेले इतर ॲप बंद करावे आणि ई-पिक पाहणी ॲप पुन्हा सुरु करावे.

42. प्रश्न: सामाईक खातेदारांनी नोंदणी कशी करावी?

उत्तर- सामाईक खातेदारांची नोंदणी करताना सर्वांच्या वतीने एकाने अथवा प्रत्येकाने स्वतःपुरता आपापली नोंदणी करावी

43. प्रश्न: संयुक्त खातेदाराने नोंदणी कशी करावी?

उत्तर- संयुक्त खातेदाराने आपापली नोंदणी स्वतंत्रपणे करावी.

44 प्रश्न: खातेदाराने स्वतःचा खातेक्रमांक निवडला परंतु त्या खाता क्रमांक वर स्वतः चे नाव न दिसता वेगळे नाव दिसत आहे अशा वेळेस काय करावे?

उत्तर- अशा वेळेस नोंदणी करू नये व संबंधित तलाठी यांच्याशी संपर्क करावा.

45. प्रश्न: इंटरनेट आवश्यक आहे असा संदेश येत आहे?

उत्तर- कृपया आपले इंटरनेट (मोबईल डाटा) ऑन करा रेंज आहे का ते तपासून पहा.

46. प्रश्न: फोटो उपलोड करताना अक्षांक्ष व रेखांक्ष घेणे बंधनकारक असा संदेश येत आहे?

उत्तर- मोबईल सेटीम्स मध्ये लोकेशन (location) अलाउ करा, जिपिएस (GPS)) ऑन करा व पुन्हा फोटो कडून सबमिट करा.

47. प्रश्न: जर एकाद्या खातेदाराचे एकापेक्षा जास्त गावात शेती असल्यास नाव नोंदणी करता येते का?

उत्तर- होय, जर एकाद्या खातेदाराचे एकापेक्षा जास्त गावात शेती असल्यास नाव नोंदणी करता येते.

48. प्रश्न: एकाद्या खातेदाराचे एकापेक्षा जास्त गावात शेती असल्यास नाव नोंदणी कशा प्रकारे करावी?

उत्तर- एकाद्या खातेदाराचे एकापेक्षा जास्त गावात शेती असल्यास त्या त्या गावाकरिता नवीन खातेदार नोंदणी करा हा पर्याय वापरून योग्य जिल्हा ,तालुका व गाव निवडून करता येते.

49. प्रश्न: जर एकाद्या खातेदाराचे एकापेक्षा जास्त गावात शेती असल्यास एकाच क्रमांकावरून नाव नोंदणी करता येते का?

उत्तर- होय, एकाद्या खातेदाराचे एकापेक्षा जास्त गावात शेती असल्यास एकाच मोबईल क्रमांकावरून नाव नोंदणी करता येते

50. प्रश्न: पिकाचा फोटो अपलोड करताना खातेदाराचा फोटो अपलोड करावा काय?

उत्तर- नाही, पिकाचा फोटो अपलोड करताना फक्त पिकाचाच फोटो अपलोड करावा

51. प्रश्न: एका घरात एका पेक्षा जास्त खातेदार आहेत जसे खातेदाराची आई. पत्नी. मुलगा, भाऊ तर या सर्वांची पिकपाहणी एकाच व्यक्तीच्या मोबईल वरून करता येईल काय?

उत्तर- होय, एका घरात एका पेक्षा जास्त खातेदार आहेत जसे खातेदाराची आई, पत्नी, मुलगा, भाऊ तर या सर्वांची पिकपाहणी एकाच व्यक्तीच्या मोबईल वरून करता येईल. यासाठी नवीन नाव नोंदणी करा हा पर्याय वापरून प्रत्येकाची स्वतंत्रपणे नाव नोंदणी करावी व संपूर्ण माहिती अपडेट करावी.

52. प्रश्न: अन्य गटावरून शेतीसाठी पाणी वापरत असल्यास त्याची नोंद कशी करावी?

उत्तर- अन्य गटावरून शेतीसाठी पाणी वापरत असल्यास त्याची नोंद पिकाची माहिती या अंतर्गत जल सिंचनाचे साधन यात अन्य गटावरील विहीर हा पर्याय निवडावा.

53 प्रश्न: पिकपाहणी यशस्वीरीत्या नोंदविल्यानंतर किती दिवसांनी ७/१२ वर दिसेल?

उत्तर- पिकपाहणी यशस्वीरीत्या नोंदविल्यानंतर तलाठी लॉगीनला जाते तलाठी यांनी माहिती योग्य आहे याची खात्री करून समती (approval) दिल्यावर ७/१२ वर आपणास पिकपैरा पाहण्यास मिळेल.

54. प्रश्न: संकेताक कायमस्वरूपी आहे कि बदलता येईल?

उत्तर- संकेताक कायमस्वरूपी आहे बदलता येणार नाही

55 प्रश्न : एका खातेदाराची नाव नोंदणी एक हेडसेट वरून एका मोबाईल क्रमांका वरून केली आहे. तर दुसर्या हेंडसेट वरून दुसरा मोबाईल क्रमांका वापरून पुन्हा नाव नोंदणी करता येईल काय?

उत्तर : होय एका खातेदारांची नाव नोंदणी एक हेंडसेट वरून एका मोबाईल क्रमांका वरून केली आहे तर दुसर्या हेंडसेट वरून दुसरा मोबाईल क्रमांका वापरून पुन्हा नाव नोंदणी करता येईल

56. प्रश्न: परिचय मध्ये फोटो अपलोड करणे अनिवार्य आहे काय?

उत्तर- नाही, परिचय मध्ये फोटो अपलोड करणे अनिवार्य नाही.

57. प्रश्न: एका खातेदाराच्या खात्यावरील सर्व गट/ भूमापन क्रमांक दिसतील का?

उत्तर- एका खातेदाराच्या खात्यावरील संबंधित गावातील त्याच्या नावे असलेली सर्व गट/ भूमापन क्रमांक दिसतील,

58. प्रश्न: एका खातेदाराच्या दुसर्या गावातील गट एकाच वेळी दिसतील काय?

उत्तर- नाही, एकाद्या खातेदाराचे एकापेक्षा जास्त गावात शेती असल्यास त्या त्या गावाकरिता नवीन खातेदार नोंदणी करा हा पर्याय वापरून योग्य जिल्हा ,तालुका व गाव निवडून त्या त्या गावातील खाता क्रमांक निवडून तेथील भूमापन क्रमांक/गटक्रमांक दिसतील व पिक पाहणी नोंदवता येईल.

59. प्रश्न: एकत्रित पेरणी केलेल्या एका पेक्षा जास्त पिकांची नोंद करता येईल काय?

उत्तर- होय, मिश्र पिक पर्याय वापरून एका पेक्षा जास्त पिकांची नोंद करता येईल.

60. प्रश्न: जमिनीचे क्षेत्र बदलता येईल काय ?

उत्तर- नाही, जमिनीचे क्षेत्र हे ७/१२ प्रमाणे आहे ते बदलता येणार नाही.

61. प्रश्न: एकदा निवडलेला हंगाम बदलता येईल काय?

उत्तर- पिक पाहणी पूर्ण भरून जर अपलोड केली असेल तर हंगाम बदलता येणार नाही. जर माहिती ई. पिक पाहणी ॲप मध्ये भरली आहे परंतु अपलोड केली नाही अथवा साठवा केली नाही ते हंगाम बदलता येईल.

62. प्रश्न: ई. पिक पाहणी बदलता येईल काय?

उत्तर- पिक पाहणी पूर्ण भरून जर अपलोड केली असेल तर माहिती बदलता येणार नाही. जर माहिती ई-पिक पाहणी ॲप मध्ये भरली आहे परंतु अपलोड केली नाही अथवा साठवा केली नाही तर माहिती बदलता येईल.

63. प्रश्न: जर शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे तर जल सिंचन प्रकार काप निवडावा?

उत्तर- जर शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे तर अजलसिंचित(जिरायत/कोरडवाहू) हा पर्याय निवडावा.

64.प्रश्न: लागवडीचा दिनांक माहित नसल्यास काय निवडावे?

उत्तर- लागवडीचा दिनांक माहित नसल्यास त्या हंगामातील अंदाजित दिनांक निवडावा

65. प्रश्न: एकापेक्षा जास्त बांधावरची झाडे नोंदता येतात काय?

उत्तर- होय. एकापेक्षा जास्त बांधावरची झाडे नोंदता येतात

66. प्रश्न: बांधावरची झाडांचे क्षेत्र निवडता येते काय?

उत्तर- नाही, बांधावरची झाडांचे क्षेत्र निवडता येत नाही.

67. प्रश्न: एकापेक्षा जास्त प्रकारची बांधावरची झाडे असल्यास नोंदवता येतात काय?

उत्तर- होय, एकापेक्षा जास्त प्रकारची बांधावरची झाडे असल्यास नोंदवता येतात या साठी बांधावरची झाडे हा पर्याय वापरून आधी झाडाचे नाव निवडून त्याची संख्या नमूद करा व साठवा/ सबमिट करा नंतर पुन्हा वरील प्रमाणे दुसर्या झाडाची माहिती नोंदवा.

68. प्रश्न: एकापेक्षा जास्त विहिरी नोंदवता येतात काय?

उत्तर- होय एकापेक्षा जास्त विहिरी असल्यास कायम पड या पर्यायात ४ सामायिक विहीर पड पर्यन्त नोंदवता येतात

69 प्रश्नः एक विहीर व एक बोर/ट्यूबवेल नोंदवता येते काय?

उत्तर- होय, एक विहीर व एक बोर/ट्यूबवेल नोंदवता येते या करिता कायम पड या पर्यायात आधी विहीर नोंदवावी व साठवून होम पेज वर क्लिक करून पुन्हा कायम पड या पर्याय निवडून बोर/ट्यूबवेल नोंदवावी

.

70. प्रश्न: कायम पड प्रत्येक हंगामात किती वेळा नोंदवता येईल?

उत्तर- कायम पड कृषी वर्षासाठी एकच वेळा नोंदवता येईल.

71. प्रश्न: सामाईक विहीर नोंदवता येईल काय?

उत्तर- होय, सामाईक विहीर कायम पड हा पर्याय वापरून नोंदवता येते.

72. प्रश्न: गावात इंटरनेट नाही तर पिक पाहणी नोंदवता येईल काय ?

उत्तर-होय, गावात इंटरनेट नसल्यास रेंज आहे अशे ठिकाणी जाऊन नाव नोंदणी करावी त्या नंतर शेतात येऊन पिक पहाणी ची सर्व माहिती भरावी फोटो काढावा व रेंज मध्ये येऊन माहिती अपलोड करावी. **इंटरनेट सुविधा ही फक्त नाव नोंदणी व माहिती अपलोड करण्यासाठी आवश्यक आहे.**

73. प्रश्न: जर खातेदाराकडून चुकून ॲप डीलिट झाले तर नोंदणीकृत माहिती मिळवता येईल काय?

उत्तर- जर खातेदाराकडून चुकून ॲप डीलिट झाले तर नोंदणीकृत मोबाईलहेंडसेट वर प्लेस्टोर वरून ई-पिक पाहणी ॲप डाऊनलोड करा व नोंदणीकृत मोबईल क्रमांक वरून खातेदार निवडून संकेतांक टाकून पुढे गेल्यावर आपणास आपली नोंदणीकृत माहिती पुन्हा पाहता येईल

74. प्रश्न: ई-पिक पाहणी ॲप बाबत माहिती हवी असल्यास काय करावे?

उत्तर ई-पिक पाहणी ॲप बाबत माहिती हवी असल्यास शंका समाधान हा पर्याय वापरावा.

75. प्रश्न: खातेदार शोधा पर्याय वापरल्यास माहिती उपलब्ध नाही असा संदेश प्राप्त होत आहे काय करावे?

उत्तर- असा संदेश येत असल्यास कृपया मराठीतून खातेदाराचे नाव टाकून शोधा

76. प्रश्न: खातेदाराची माहिती इंग्रजीमध्ये भरल्यास नाव शोधता येईल काय?

उत्तर- नाही, मराठीत माहिती भरणे आवश्यक आहे त्यासाठी मराठी गुगल इंडीक किबोर्ड वापरावा. मराठी किबोर्ड नसल्यास स्वागत स्क्रीन वर मराठी किबोर्ड वर क्लिक करून प्ले स्टोर वरून डाऊनलोडकरून मराठीत माहिती भरावी.

77. प्रश्न: चुकीचा पिकपेरा नोंदवलपास काय करावे?

उत्तर- चुकीचा पिकपेरा नोंदवल्याचे माहिती उपलोड करण्यापूर्वी लक्ष्यात अल्यास स्वयांघोषनेपुर्वी रद्द हे बटन दाबून आवश्यक ती दुरुस्ती करावी. उपलोड केल्यानंतर लक्ष्यात अल्यास २४तासांत कधीही खातेदारास ती दुरुस्त करता येईल. मात्र त्यानंतर दुरुस्तीसाठी तलाठी यांच्याशी संपर्क साधावा व या बाबत माहिती द्यावी. सदर दुरुस्ती वलाठी लॉगीन ला दुरुस्त करून घ्यावी.

78. प्रश्न: जल सिंचन चुकीचा नोंदवल्यास काय करावे?

उत्तर- जल सिंचन चुकीचा नोंदवल्यास तलाठी यांच्याशी संपर्क साधावा व या बाबत माहिती द्यावी. सदर दुरुस्ती तलाठी लॉगीन ला दुरुस्त करून घ्यावी.

79. प्रश्न: चुकीचा पिकपेरा नोंदवला असेल व तलाठी यांनी तो स्वीकृत केला असेल तर काय करावे?

उत्तर- चुकीचा पिकपेरा नोंदवला असेल व तलाठी यांनी तो स्वीकृत केला असेल तर सदर पिक पाहणी मंडल अधिकारी यांच्या लॉगीन ने दुरुस्त करून घ्यावी.

80. प्रश्न: कोल्ड स्टोरेज नोंद कशी करावी?

उत्तर- कायम पड हा पर्याय अंतर्गत कोल्ड स्टोरेज पड नोंद करावी.

81. प्रश्न: जनावरांचा गोठा नोंद कशी करावी?

उत्तर- कायम पड हा पर्याय अंतर्गत जनावरांचा गोठा पड नोंद करावी.

82. प्रश्न: कांदाचाळ पड नोंद कशी करावी?

उत्तर: कायम पड हा पर्याय अंतर्गत कांदाचाळ पड नोंद करावी.

83. प्रश्न: गोटफार्म नोंद कशी करावी?

उत्तर- कायम पड हा पर्याय अंतर्गत गोटफार्म पड नोंद करावी.

84. प्रश्न: मत्स्यशेती नोंद कशी करावी?

उत्तर- कायम पड हा पर्याय अंतर्गत मत्स्यशेती पड नोंद करावी.

85 . प्रश्न: सार्वजनिक विहीरिची नोंद कशी करावी?

उत्तर- कायम पड हा पर्याय अंतर्गत सार्वजनिक विहीर पड नोंद करावी.

86. प्रश्न: मसाले पिक यांची नोंद करता येते काय?

उत्तर- होय पिकाची माहिती या पर्याय अंतर्गत पिकांची झाडांची नावे यात नोंद करता येते.

87. प्रश्न: फुलझाडे यांची नोंद करता येते काप?

उत्तर- होय, पिकाची माहिती या पर्याय अंतर्गत पिकांची/झाडांची नावे यात नोंद करता येते.

88. प्रश्न: भाजीपाला याची नोंद करता येते काय?

उत्तर- होय पिकाची माहिती या पर्याय अंतर्गत पिकाची/झाडांची नावे यात नोंद करता येते.

89. प्रश्न: माझ्या शेतात पोलीहाउस आहे त्यातील पिकांची  नोंद करता येते काय?

उत्तर- होय पोलीहाउसची नोंद पिकाची माहिती या पर्याय अंतर्गत नावे यात नोंद करता येते.

90. प्रश्न: मोबाईल हरवल्यास काय करावे?

उत्तर- आपला मोबाईल हरवल्यास नवीन मोबाईलवर आपला नोंदणीकृत मोबाईल क्रमांक वापरून रिस्टोर करू शकता.

91. प्रश्न: नवीन मोबाईल क्रमांक वापरून जुनी माहिती पुन्हा प्राप्त करता येईल काय?

उत्तर- नवीन मोबाईल क्रमांक वापरून जुनी माहिती पुन्हा प्राप्त करता येईल.

92. प्रश्न: एकदा माहिती साठवा केल्यावर माहिती बदलता येईल काय?

उत्तर- एकदा माहिती साठवा केल्यावर माहिती बदलता येत नाही.

93. प्रश्न: एकदा एका हंगामात माहिती साठवा केल्यानंतर पुढील हंगामात पिक पहाणी करता पेईल काय?

उत्तर- होय एकदा एका हंगामात माहिती साठवा केल्यानंतर पुढील हंगामात पिक पहाणी करता येईल

94. प्रश्न: प्रत्येक हंगामात नव्याने नाव नोंदणी करावी लागेल काय?

उत्तर- नाही, प्रत्येक हंगामात नव्याने नाव नोंदणी करण्याची आवश्यकता नाही आपण आपल्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांक वापरून पुढील हंगामाची पिकपाहणी यशस्वीरीत्या करू शकता.

95 . प्रश्न: एका शेतात काही पिक खरीप हंगामातील आहेत व काही पिक बहुवार्षिक आहेत तर एकाच शेतात अशी पिक पाहणी करता येईल काय?

उत्तर: होय, एका शेतात खरीप हंगामातील पिक व बहुवार्षिक पिक यांची पिक पाहणी करता येऊ शकते

.

96. प्रश्न: एकाच शेतात खरीप हंगामातील पिक व बहुवार्षिक पिक यांची नोंद कश्या प्रकारे करावी?

उत्तर- ई-पिक पाहणी मध्ये पिकांची माहिती या पर्यापात आधी खरीप हंगामाची पिक पाहणी भरून फोटो सबमिट करावा व त्यानंतर उर्वरित क्षेत्रासाठी बहुवार्षिक पिकांची माहिती या पर्यायात संपूर्ण वर्ष निवडून पिक पाहणी योग्य रित्या भरून फोटो सबमिट करावा

97. प्रश्न: एकाच शेतात खरीप हंगामात एका पेक्षा जास्त निर्भेळपिक नोंदवता येतील का?

उत्तर- होय, एकाच शेतात खरीप हंगामात एका पेक्षा जास्त निर्भेळपिके नोंदवता येतील.

98. प्रश्न: एकाच शेतात खरीप हंगामात एका पेक्षा जास्त निर्भेळ पिक नोंद कशी घ्यावी?

उत्तर- ई-पिक पाहणी मध्ये पिकांची माहिती या पर्यायात आधी एका निर्भेळ पिकाची खरीप हंगामाची पिक पाहणी भरून फोटो सबमिट करावा व त्यानंतर उर्वरित क्षेत्रात दुसऱ्या निर्भेळ पिकाची पिकांची माहिती या पर्यायात निर्भेळ पिक निवडून पिक पाहणी योग्य रित्या भरून फोटो सबमिट करावा अशाप्रकारे एका पेक्षा जास्त निर्भेळ पिकाची नोंद करता येते.

99. प्रश्न: एकावेळी किती मिश्र पिकांची नोंद करता येते?

उत्तर- एकावेळी एक मुख्य पिक व ३ तीन दुय्यम पिकांची मिश्र पिक म्हणून नोंद करता येते.

100. प्रश्न: एका गटावर किती मिश्र पिकांची नोंद करता येते?

उत्तर- एका गटावर एकावेळी एक मुख्य पिक व ३ तीन दुय्यम पिकांची मिश्र पिकांची नोंद करता येते या पेक्षा जास्त दुय्यम पिके असल्यास आधी ३ मिश्र पकांची नोंद करून फोटो सबमिट करावे व पुन्हा वरीलप्रमाणे उर्वरित क्षेत्रासाठी मिश्र पिकांची नोंद करावी.

101. प्रश्न: एका गटावर एकाच वेळी निर्भेळ पिक व मिश्र पिक यांची नोंद करता येते का?

उत्तर- होय, ई-पिक पाहणी मध्ये पिकांची माहिती या पर्यायात आधी निर्भेळ पिकाची खरीप हंगामाची पिक पाहणी भरून फोटो सबमिट करावा व त्यानंतर उर्वरित क्षेत्रात मिश्र पिकाची पिक पाहणी पिकांची माहिती या पर्यायात मिश्र पिक निवडून पिक पाहणी योग्य रित्या भरून फोटो सबमिट करावा अशाप्रकारे एका गटावर निर्भेळ पिक व मिश्र पिक या पिकाची नोंद करता येईल

102. प्रश्न: बिनशेती पड़ नोंद करता येते काय ?

उत्तर- कायम पड हा पर्याय अंतर्गत बिनशेती पड नोंद करावी.

103. प्रश्न: एका गटात शेततळ आहे तर याची नोंद करता येईल काय?

उत्तर- होय गटात शेततळ असल्यास कायम पड या पर्याय अंतर्गत शेततळ पड़ निवडून नोंद करता येईल,

104. प्रश्न: अ‍ॅपल आय फोन(Apple/i-phone) वरून पिक पाहणी करता येईल काय?

उत्तर- नाही, अ‍ॅपल / आय-फोन Apple/i-phone) वरून पिक पाहणी करता येणार नाही

105. प्रश्न: शेतात पिकांना मोकळे पाणी सोडले आहे/ सारी पद्धत तर जल सिंचन पद्धत कोणती निवडावी

उत्तर- यासाठी प्रवाही सिचन हा पर्याय निवडावा

106. प्रश्न : जिओ-फेंसिन्ग म्हणजे काय ?

उत्तर- जिओ-फेंसिन्ग हि इ-पीक पाहणी मोबाईल अँप मध्ये दिलेली एक सुविधा आहे, जी आपल्याला आपण निवडलेल्या गटाची पीकपाहणी करतांना आपण गटाच्या मध्यापासून निर्धारित अंतरावर आहोत किंवा नाही याबाबत सूचना देतो.

107. प्रश्न : मध्य बिंदू म्हणजे काय ?

उत्तर - गटाचा मध्यबिंदू हे त्या गटाच्या क्षेत्राचे भौमितिक मध्य बिंदू असेल.

108.प्रश्न: मोबाईल अँप मध्ये आपण आपल्या गटाच्या निर्धारित अंतरापासून दूर आहात असा मेसेज आल्यास काय करावे ?

उत्तर -आपण पिक पाहणी निवडलेल्या गटाच्या जवळ जाऊन पुन्हा लोकेशन आणि फोटो घेण्याचा प्रयत्न करावा.

109. प्रश्न : शेताच्या बांधावर उभा आहे तरी देखील मोबाईल अँप मध्ये "आपण आपल्या गटाच्या निर्धारित अंतरापासून दूर आहात" असा मॅसेज आल्यास काय करावे ?

उत्तर- आपण पीक पाहणी साठी निवडलेल्या गटाच्या जवळ आहेत अशी खात्री असल्यास वरील मेसेज कडे दुर्लक्ष करून पिकाचा फोटो काढावा.

110. प्रश्न : अक्षांश / रेखांश मिळवतांना दर्शवलेली अचूकता म्हणजे काय ?

उत्तर - आपण आपल्या शेतात ज्या ठिकाणी उभे आहेत ते स्थान आणि उपग्रहा मार्फत दर्शविलेले स्थान यामधील संभाव्य फरक म्हणजे अचूकता.

111. प्रश्न : शेताच्या मध्यबिंदू पासून फोटो घेण्याचे स्थान यामधील अंतर अचूक येण्यासाठी किमान अचूकता किती असणे आवश्यक आहे ?

उत्तर- अचूक अंतर येण्यासाठी किमान अचूकता १० मीटर किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

112. प्रश्न : किमान अचूकता मिळविण्यासाठी काय करावे ?

उत्तर- अ ) अँप मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे आपले मोबाईल मधील GPS सेटिंग करून घ्यावीत किंवा

ब ) "अक्षांश / रेखांश घेतांना मोबाईल flite mode / aeroplane mode मध्ये ठेवावा किंवा

क) "अक्षांश / रेखांश मिळावा" हे बटन परत एक / दोन वेळेस दाबावे म्हणजे किमान अचूकता प्राप्त होईल.

113. प्रश्न : किमान आधारभूत योजने अंतर्गत शेतकऱ्याला विक्रीसाठी संमती देण्याची, ई-पिक पाहणी अँप मध्ये सोय आहे काय ?

उत्तर - होय, किमान आधारभूत योजने अंतर्गत समाविष्ठ पिकांच्या बाबतीत शेतकऱ्याला सदर योजने अंतर्गत आपल्या पिकांची विक्री करण्यास संमती देण्याची सोय मोबाईल अँप मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

114. प्रश्न : किमान आधारभूत योजने अंतर्गत पिकांच्या विक्रीस संमती कशी नोंदविता येईल ?

उत्तर- आपण किमान आधारभूत योजने अंतर्गत येणाऱ्या पिकांपैकी एखादे पीक निवडल्यास आपणास **"सदर पिकाची किमान आधारभूत योजने अंतर्गत विक्री साठी नोंदणी करावयाची आहे?"** काय असा प्रश्न दिसेल. आपणास होय हा पर्याय निवडून आपली संमती नोंदविता येईल.

115. प्रश्न : किमान आधारभूत योजने अंतर्गत विक्री साठी संमती का नोंदवावी ?

उत्तर- खातेदाराने या अँप द्वारे किमान आधारभूत योजने अंतर्गत विक्री साठी संमती नोंदविल्यास सदर खातेदाराची किमान आधारभूत योजने अंतर्गत नोंदणीची ( रेजिस्ट्रेशन ) प्रक्रिया पुरवठा विभागा कडून सुरु करण्यात येईल. त्यासाठी संमती नोंदविणे आवश्यक आहे.

116. प्रश्न : स्वयं घोषणापत्र कोणत्या कोणत्या बाबींसाठी देणे आवश्यक आहे ?

उत्तर- कायमपड क्षेत्र नोंदणीसाठी, बांधावरची झाडे नोंदणीसाठी व पिकांच्या नोंदणीसाठी स्वयं घोषणापत्र देणे आवश्यक आहे.

117. प्रश्न : इ-पीक पाहणी मोबाईल अँप मध्ये, अँप बाबत अभिप्राय नोंदविण्याची सोय आहे काय ?

उत्तर- होय, इ-पीक पाहणी मोबाईल अँप मध्ये होम स्क्रीन वरील "मत नोंदवा" हे बटन दाबून आपण आपला अभिप्राय नोंदवू शकता.